प्रेसनोट

दि.०६/०२/२०१९

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | अहमदनगर/नाशिक |
| गुन्हा नोंद क्रमांक | राहुरी पोलीस स्टेशन, जि.अहमदनगर येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया चालू आहे. |
| कलम | ला.प्र.का. सन १९८८ (संशोधन) सन २०१८ चे कलम ७, १२ |
| आरोपीचे नांव व कार्यालय | १)नानाभाऊ विश्वनाथ महानवर,मुख्याधिकारी,देवळाली प्रवरा नगर परिषद,ता.राहुरी, जि.अहमदनगर<br>२)मुकूंद रामराव मुसमाडे,सहायक फायरमन,देवळाली प्रवरा नगर परिषद, ता.राहुरी, जि.अहमदनगर |
| मागणी केलेल्या लाचेची रक्कम | रुपये २,००,०००/— |
| स्विकारलेली लाचेची रक्कम | रुपये २,००,०००/— |
| थोडक्यात माहिती | प्रस्तुत बातमीतील हकीगत अशी की, तक्रारदार यांची कंपनी विविध शहरामध्ये साफ सफाईचे काम करते. त्याप्रमाणे त्यांनी मे २०१८ मध्ये राहाता शहरातील साफसफाईसाठी नगर परिषद राहाता येथे घन कचरा सफाईची ई निविदा भरली होती. त्याप्रमाणे त्यांची निविदा मंजूर करण्यात आली होती. त्याप्रमाणे त्यांनी १ डिसेंबर २०१८ पासून कामास सुरूवात केली होती. परंतू दिनांक ५ जानेवारी २०१९ रोजी मुख्याधिकारी राहाता नगर परिषद यांनी अचानक काम बंदची नोटीस तक्रारदार यांना दिली. त्यामध्ये तक्रारदार विरूध्द कामासंबंधीचे तक्रारी व महिला कामगारास कामावरून कमी केल्याचा उल्लेख केला. यातील आरोपी लोकसेवक नानाभाऊ विश्वनाथ महानवर, मुख्याधिकारी, देवळाली प्रवरा नगर परिषद, ता.राहुरी यांनी तक्रारदार यांना बोलावून घेवुन माझेकडे जिल्हा नियोजन अधिकारीचा अतिरीक्त कार्यभार होता व मीच प्रयत्न करून तुमचे राहाता येथील ई निविदा मंजुर करून घेतली आहे. त्या बदल्यात बक्षिस म्हणून व मुख्याधिकारी राहाता यांचेशी मध्यस्थी करून कामास असलेला स्थगिती आदेश मागे घेण्यास सांगतो, असे म्हणुन त्या मोबदल्यात एकूण निविदा रकमेच्या ६ टक्के प्रमाणे तक्रारदार यांचेकडे लाचेची मागणी केली. यातील तक्रारदार यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग अहमदनगरशी संपर्क करून त्यांचे विरूध्द लाचेची तक्रार नोंदविली त्या तक्रारीचे अनुषंगाने दिनांक ३०/०१/२०१९ रोजी लाचमागणी पडताळणी केली असता, यातील लोकसेवक नानाभाऊ महानवर यांनी तक्रारदार यांच्याकडे ६ टक्के प्रमाणे दोन लाख रूपये लाचेची मागणी करून ती लाचेची रक्कम आज दिनांक ०६/०२/२०१९ रोजी देवळाली प्रवरा नगर परिषदेचे मुकूंद रामराव मुसमाडे, सहायक फायरमन यांना स्विकारण्यास सांगितली. त्यांचे सांगणेप्रमाणे यातील लोकसेवक मुकूंद मुसमाडे यांनी सदर लाचेची २,००,०००/— रूपये रक्कम ही राहुरी फॅक्टरी येथील अहमदनगर—मनमाड रोडवरील समाधान हॉटलचे लगत असलेल्या सेंट्रल बॅकेच्या समोर रस्त्यावर स्विकारली असता त्यांना रंगेहात पकडण्यात आले आहे. तसेच लोकसेवक नानाभाऊ विश्वनाथ महानवर, मुख्याधिकारी नगरपरिषद देवळाली प्रवरा यांना ताब्यात घेण्यात आले आहे. |

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागण्या—या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, महाराष्ट्र राज्य यांच्याशी संपर्क करावा.

संपर्क पत्ता :— लाचलुचपत प्रतिबंधक विभाग कार्यालय, जिल्हा मध्यवर्ती प्रशासकिय इमारत,
टि.व्ही. सेंटरसमोर, सावेडी, अहमदनगर

संकेतस्थळ :— acbmaharashtra.gov.in

ई—मेल ऑनलाईन तक्रार :— acbwebmail@mahapolice.gov.in

ॲप्लीकेशन :— acbmaharashtra.net

टोल फ्री क्रमांक :— १०६४

दुरध्वनी क्रमांक :— ०२४१—२४२३६७७

व्हॉटस अप क्रमांक:— ९९३०९९७७००

(किशोर चौधरी)
पोलीस उप अधीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,अहमदनगर

Scanned by CamScanner